36

'A' प्रमाणे कार्यवाहिस्तव 1412
व.लि.
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक, नगर रचना (ना.सं.ध.)
आ.क्र. 277 दिनांक-14.02.25
संबंधित अधि./कर्म.
न.र. 14-2-25
उ.सं.न.र.

**मंजुर विकास योजना, श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर**
मौजे श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर न.भू.क्र. ११३६, ११३७ व ११३८ या जमिनीवरील आ. क्र. १२ "वाचनालय" हे आरक्षण व्यपगत झाल्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ (२) चे तरतूदीन्वये आदेश निर्गमित करणेबाबत.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती कार्यालये,**
**पुणे - ४११ ००१**

**निर्णय**: जा.क्र. डि.टी.पी./वि.यो. श्रीगोंदा/कलम-१२७(२)/ आदेश /प्र.क्र. १३७४
/टिपीव्ही-४/ ९९२ **दिनांक** :-०७.०२.२०२५.

सोबतचे मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (इंग्रजी व मराठी) भाषेत महाराष्ट्र शासन राजपत्र, नाशिक विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावेत.

(दे.व्यं. चावरे)
कार्यासन अधिकारी, टिपीव्ही-४,
मुख्य कार्यालय, पुणे.

प्रति,

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा, पुणे.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (इंग्रजी व मराठी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, नाशिक विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या **५ छापील प्रती** या कार्यालयास व **प्रत्येकी २ छापील प्रती** सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक आणि सहायक संचालक, नगर रचना, अहिल्यानगर शाखा, अहिल्यानगर यांना पाठवाव्यात.

**प्रत माहितीस्तव सादर** :-

१.मा. अप्पर मुख्य सचिव (१),महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग(नवि-९),मंत्रालय, मुंबई-३२.

२.मा. सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक.
३.मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४.मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव** :-

५. मा. उपसंचालक नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर आदेश अभिलेखार्थ त्यांचेकडील त्या संबंधीच्या संकलन नस्तीमध्ये जोडावेत. तसेच सदर आदेश संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करावेत.

६. मा. सहायक संचालक, नगर रचना, अहिल्यानगर शाखा, अहिल्यानगर.

/-प्रस्तुत प्रकरणी त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने संचालनालयाकडून अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या **सहा** प्रती संचालनालयास विहीत मार्गाने त्वरीत सादर कराव्यात.

७. मुख्याधिकारी, श्रीगोंदा नगर परिषद, जि. अहिल्यानगर.
८. प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे यांनी सदर आदेशानुसारचा फेरबदल मुख्य कार्यालयातील विकास योजना नकाशावर दर्शवून तो अद्ययावत करावा.
९. श्री. अंशाबापु हिराजी गोरे, रा. शिवाजी चौक, श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर.

महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती इमारत,पुणे,४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६ Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in

## आदेश

जा.क्र. डि.टी.पी./वि.यो. श्रीगोंदा/कलम-१२७(२)/ आदेश /प्र. क्र. १३७४/ टिपीव्ही-४/ ६६२ दि.०७.०२.२०२५.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

ज्याअर्थी, श्रीगोंदा नगरपरिषद हद्दीची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "**उक्त अधिनियम**" असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस - १९९६ / ११६० / प्र. क्र. २५६ / नवि-०९, दि.१४.०३.१९९७ अन्वये मंजूर केली असून, ती दि. ३१.०५.१९९७ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे **"उक्त मंजूर विकास योजना"** असे संबोधिले आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील, मौजे श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर येथील सि.स.नं. ११३६, ११३७ व ११३८ या जमिनींवरील क्षेत्र आ.क्र. १२ "वाचनालय" (यापुढे **"उक्त आरक्षण"** असे संबोधिले आहे) या आरक्षणाने बाधित होत आहे;

आणि ज्याअर्थी उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समूचित प्राधिकरण हे **श्रीगोंदा नगरपरिषद, श्रीगोंदा** (यापुढे **"उक्त समुचित प्राधिकरण"** असे संबोधिले आहे) आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त आरक्षण अंमलात आल्याच्या दिनांकापासुन १०(दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाने बाधित होणा-या मौजे श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर येथील सि.स.नं. ११३६, ११३७ व ११३८ या जमिनींमधील क्षेत्राबाबत (यापुढे "**उक्त जमीनी**" असे संबोधिले आहे) उक्त जमिनीच्या मालकांनी (यापुढे "**उक्त जमीन मालक**" असे संबोधिले आहे) दि.२४.०९.२०२० रोजी उक्त समूचित प्राधिकरणावर उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतूदीन्वये सूचना (यापुढे "**उक्त सूचना**" असे संबोधिले आहे) बजाविलेली असून ती उक्त समुचित प्राधिकरणास दि. २४.०९.२०२० रोजी प्राप्त होती;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (१) मधील तरतूदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठाने उक्त जमीन मालकांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ९६१८/२०२३ या याचिकेमध्ये दि.०९.०१.२०२४ रोजीच्या निर्णयान्वये उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत ठरविल्याचे आदेश पारित केले आहेत;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, अहिल्यानगर शाखा, अहिल्यानगर व सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी उक्त आरक्षणाने उक्त जमिनींचे १२४.८० चौ.

मी. क्षेत्र बाधित होत असल्याचे नमुद करून उक्त अधिनियमाच्या कलम १२७(२) चे तरतूदीन्वयेची अधिसूचना निर्गमित करणे योग्य होणार असल्याचे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उपकलम (१) चे तरतुदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले असून, उक्त अधिनियमाच्या कलम १२७ चे उपकलम (२) चे तरतुदीनुसार, उक्त जमीन मालकाच्या उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३२११/ प्र.क्र.५०८/नवि-१३, दि.०१.१२.२०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरण असलेल्या नगरपरिषदा / नगर पंचायती आणि जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतूदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ चे तरतूदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशान्वये खालील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत :-

## परिशिष्ट

| अ. क्र. | नगर परिषद, मौजे, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व विकास योजना अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | उक्त सूचनेखालील उक्त जमिनीचा तपशिल | व्यपगत झालेल्या आरक्षणाचे अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीगोंदा नगर परिषद,<br>ता. श्रीगोंदा<br>जि. अहिल्यानगर | आ. क्र. १२-<br>"वाचनालय"<br>(क्षेत्र १७६.०० चौ. मी.) | न.भू.क्र. ११३६,<br>११३७ व ११३८ | १२४.८० |

टिप:-१) उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर व मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

२) उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणाऱ्या उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, नगर परिषद, श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३) सदर आदेश संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**Government of Maharashtra**
**Town Planning and Valuation Department**
**Directorate Of Town Planning**
**Ground floor, Central Building, Pune 411 001**
**Telephone No. 020-26122076 Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in**

---

## ORDER

No. D.T.P/D.P.Shrigonda /Sec-127(2)/Order/C.R.No. 1374 /TPV-IV/662 Date:-.07 02.2025.

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

Whereas, the Development Plan of Shrigonda has been sanctioned under the provisions of section 31 (1) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "**the said Act**") by the Government of Maharashtra in Urban Development Department vide its Notification No. TPS-1996/1160/CR-256/UD-09, dt.14.03.1997 and the same has come into force with effect from 31.05.1997; (hereinafter referred to as "**the said sanctioned Development Plan**");

And whereas, as per the said sanctioned Development Plan, the land bearing C.T.S No. 1136,1137 & 1138 of Mouze Shrigonda, Tal- Shrigonda, Dist. Ahilyanagar (hereinafter referred to as "**the said Lands"**) are affected by the Reservation namely Site No. 12 "Library" (hereinafter referred to as "**the said Reservation**");

And whereas, the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is Shrigonda Municipal Council, Shrigonda (hereinafter referred to as "**the said Appropriate Authority**");

And whereas, the said land affected by the said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Reservation came into force;

And whereas, the owner of the said land (hereinafter referred to as "the said Owner") had served a Notice dt.24.09.2020 under the provisions of section 127(1) of the said Act (hereinafter referred to as "the said Notice") to the said Appropriate Authority which was received by the said Appropriate Authority on 24.09.2020;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps for acquisition of the said land as required under the provisions of Section 127(1) of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period after the date of service of the said Notice;

And whereas, Hon'ble High Court, Mumbai, Bench at Aurangabad in the Writ Petition No. 9618/023 filed by the said Owner has passed an Order dt.09.01.2024 that the said Reservation on the said Land has been lapsed;

And whereas, the Assistant Director of Town Planning, Ahilyanagar Branch, Ahilyanagar and Joint Director of Town Planning, Nashik Division, Nashik has informed that A total area of 124.80 sq.m. of the suit land is affected by the said reservation and accordingly, it would be appropriate to pass an order as per the provisions of section 127(2) of the said Act;

And whereas, in accordance with the provision of section 127(1) of the said Act, the said Reservation on the said Land has lapsed, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order under thr provisions of section 127(2) of the said Act, regarding the lapsing of the said Reservation on the said Land of the said Owner;

And whereas, the Government in Urban Development Department under the provisons of Section 151 of the said Act, vide Resolution No.TPS-1813/3211/CR-508/UD-13, dt.01.12.2016, has delegated the powers exercisable by it to take action under the provisons of Section 127(2) of the said Act, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and Zilla Parishad as a Planning Authority;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune by this order and as mentioned in the schedule hereinafter hereby notifies the lapsing of the said Reservations in respect of the said Land in the said sanctioned Development Plan under the provision of section 127(2) of the said Act and for that purpose amends the said Notification, as follows :-

**SCHEDULE**

| **Sr. No.** | **Municipal Council, Mouje, Tal, Dist.** | **Reservation of the said sanctioned Development Plan & its approximate area as per Development Plan Report** | **Description of the said Land under the said Notice** | **Approximate Area of the lapsed Reservation (Sq.m.)** |
|---|---|---|---|---|
| 1 | Shrigonda Nagar Parishad, Mouje Shrigonda, Tal. Shrigonda, Dist. Ahilyanagar | Site No.12 - "Library", (Area 176.00 Sq.m.) | C.T.S No. 1136,1137 & 1138 | 124.80 |

**Note :-**

1) The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.
2) A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Land which is lapsed from the said Reservations, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Shrigonda, Dist. Ahilyanagar during office hours on all working days for inspection to public up to One month.
3) This Order shall also be published on the Directorate's official website.**www.dtp.maharashtra.gov.in**

**(Avinash B. Patil)**
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.